# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

## अपिल क्रमांक : के.आर-७०१/२०२२

**अपिलार्थी, श्री.हेमंत अनंत राऊत**
**३०१ जय प्लाझा, कॉलेज रोड**
**मसोली, डहाणू रोड**
**ता.डहाणू, जि.पालघर ४०१ ६०१**

विरुध्द

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकुन<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय डहाणू विभाग डहाणू<br>डहाणू आग्रा रोड, कॉटेज हॉस्पिटल जवळ<br>मु.पो.ता.डहाणू, जि.पालघर ४०१ ६०१ | प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा नायब तहसिलदार<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय डहाणू विभाग डहाणू<br>डहाणू आग्रा रोड, कॉटेज हॉस्पिटल जवळ<br>मु.पो.ता.डहाणू, जि.पालघर ४०१ ६०१ |

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ३०.५.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २९.९.२०२१ | ---- | ८.११.२०२१ | ----- |

अपिलार्थी यांनी दि.२३.२.२०२२ रोजीच्या अर्जान्वये "निर्धारित कालावधीमध्ये माहिती प्राप्त झाली नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिल अर्जात त्यांनी जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी यांचेवर दंडात्मक कारवाई करण्यात यावी अशी विनंती केली आहे.

सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ३०.५.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

*" (डॉ.किरण महाजन, निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हा पालघर यांचे पत्र दि.२०.०८.२०२१ प्रत जोडली आहे त्यानुसार आपल्या कार्यालयाने जिल्हाधिकारी पालघर यांना पाठविलेल्या स्वयंस्पष्ट अहवाल, पत्रव्यवहार गुन्हा दाखल करण्याची शिफारस व इतर स्वरुपामधिल माहिती मिळण्याबाबत व इतर माहिती). "*

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "निर्धारित कालावधीमध्ये माहिती प्राप्त झालेली नाही असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी अपिलार्थी,जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलिय अधिकारी अनुपस्थित असल्यामुळे या संदर्भाची सद्यस्थिती जाणून घेता आली नाही. तथापि, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाली नसल्याचा निष्कर्ष काढता येतो.

सबब, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती पुरविण्याबाबत विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी पुढील ३० दिवसांत निर्णय घ्यावा व अशी माहिती पुरविण्याचा निर्णय जन माहिती अधिकारी यांनी घेतल्यास ती अपिलार्थी यांना त्यापुढील १५ दिवसांत विनाशुल्क पुरविणे उचित होईल. तसेच माहिती न पुरविण्याचा निर्णय विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी घेतल्यास तसेदेखील उत्तर अपिलार्थीस याच मुदतीत पुरविणे उचित होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**<u>आदेश</u>**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, उपविभागीय अधिकारी कार्यालय डहाणू विभाग, डहाणू यांनी **अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती पुरविण्याबाबत पुढील ३० दिवसात निर्णय घ्यावा व अशी माहिती पुरविण्याचा निर्णय जन माहिती अधिकारी यांनी घेतल्यास ती अपिलार्थी यांना त्यापुढील १५ दिवसांत समक्ष/**

**नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी.** माहिती न पुरविण्याचा निर्णय विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी घेतल्यास तसेदेखील उत्तर अपिलार्थीस याच मुदतीत पुरवावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ३० मे, २०२४

राज्य माहिती आयोग
महाराष्ट्र

**(शेखर चन्द्रे)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**